## थोडक्यात

### अंबिका माता मंदिरातील दानपेट्या फोडल्या

**नांदुरशिंगोटे ।** गावालगत असलेल्या मनसापुरी महाराज मठातील अंबिका माता मंदिरात मध्यरात्री चोरट्यांनी दानपेट्यांवर डल्ला मारला. खिडकीचे गज कापून आत प्रवेश करून तिन्हीही दानपेट्या फोडण्यात आल्या. चोरट्यांनी अंदाजे १८ ते २० हजार रुपये रोख रक्कम व अडीच हजार रुपये किमतीचा सीसीटीव्ही डीव्हीआर चोरूननेला. दुसऱ्या दिवशी सकाळी सुनील गोसावी यांना सदर प्रकार लक्षात आला. वावी पोलिसांनी पंचनामा करत ठसेतज्ज्ञ व श्वानपथक पाचारण केले. सीसीटीव्ही फुटेजवरून तीन चोरटे असल्याचा पोलिसांचा संशय आहे.

### भांडी लांबवली

**चांदवड ।** तालुक्यातील वाहेगाव साळ शिवारातील हॉटेल मधून १५ हजार रुपये किंमतीची स्वयंपाकाची भांडी चोरून नेणाऱ्या विरूद्ध चांदवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या संदर्भात राजेंद्र काशिनाथ खैरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पोलिसांनी बिभीषण सुकदेव ठाकरे (रा. साळसाणे) याचे विरूद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

### चौघांविरुध्द गुन्हा

**मालेगाव ।** मागील भांडणाची कुरापत काढून एका तरुणास मारहाण करणाऱ्या चौघांविरुद्ध पवारवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी अबूसलाम शेख (१७, रा. लबैक हॉटेलजवळ) या पंचर काढणाऱ्या तरुणाने पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याला सलमान, शोएब, नविद व अफसार (पूर्ण नावे नाहीत) या चौघांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

### सेवा संघाचा वर्धापनदिन

**मालेगाव ।** येथील मराठा सेवा संघातर्फे सेवा संघाचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. हॉटेल मराठा दरबार सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघाचे उपाध्यक्ष प्रा.जगदीश खैरनार होते. यावेळी राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिघे, विवेक पाटील, संजय कोर, विवेक पाटील उपस्थित होते. संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अनिल पाटील यांनी मार्गदर्शन केले.

### दुचाकी लंपास

**मालेगाव ।** जुना आग्रारोड भागातील भाला कॉम्प्लेक्स इमारती समोर उभी केलेली दुचाकी (एम.एच. ४१ एडब्ल्यू ९९३५) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार छावणी पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. महेश वसंत पगारे (रा. संगमेश्वर) याने दिलेल्या फिर्यादीनुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला असून हवालदार सोनवणे तपास करीत आहेत.

### योगात सिल्व्हरचे यश

**सिन्नर ।** सिल्व्हर लोटस स्कूलमधील इयत्ता दहावीचे यतीन गोरे व यश वायचळे यांची तालुकास्तरीय योगा स्पर्धेमध्ये तर वैभवी रुपवते, कार्तिकी लोंढे, अमृता पंडित, निल पठारे, सम्यक पठारे, प्रथम कांबळे यांनी तालुकास्तरीय कराटे स्पर्धेत यश मिळवले. त्यांची जिल्हास्तरीय योगा व कराटे स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. शाळेचे संस्थापक दिलीप बिन्नर, संचालिका सोनल बिन्नर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

### नेट ,सेट परीक्षा मार्गदर्शन

**सिन्नर ।** सिन्नर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाने पदोत्तर विद्यार्थ्यांसाठी 'नेट आणि सेट पेपर-१' या विषयावरवर प्रा. दिपक भालेराव यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी नेट सेट पेपर-१ मध्ये कोणत्या प्रकारचे प्रश्न विचारले जातात व त्याचे उत्तर कसे द्यावे याविषयी माहिती दिली. प्राचार्य डॉ. एन. यु. पाटील यांनी शैक्षणिक अहर्ता याविषयी मार्गदर्शन केले.

### भटके विमुक्त दिन

**सिन्नर ।** सहाय्यक संचालक कार्यालयात भटके विमुक्त दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून संतोष चव्हाण, महाज्योतीच्या नाशिक विभागीय प्रकल्प व्यवस्थापक सुवर्णा पगार, प्रादेशिक कार्यालयाचे गट ब अधिकारी सुभाष फड, निवृत्त नायब तहसीलदार दत्ता वायचळे उपस्थित होते.

# अभ्यासक्रमातून पिंपळगाव महाविद्यालय बनणार एआय सेंटर

## ग्रामीण विद्यार्थ्यांना करिअरच्या नवनवीन संधी; तिन्ही शाखामध्ये शिकवण्याचा प्रयत्न

वर्धापनदिन विशेष

**पायल छाजेड**



**मविप्र** संस्थेच्या पिंपळगाव बसवंत येथील क. का. वाघ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात नव्या शैक्षणिक वर्षापासून बी. एस्सी. आणि एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक सायन्स या अभ्यासक्रमांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हा विषय शिकविला जात आहे. महाविद्यालयाने आंतरराष्ट्रीय एआय रिसर्च सेंटर बनण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे.

या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात करिअरच्या नवनवीन संधी उपलब्ध होणार आहेत. एआय अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थी जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनून उद्योग क्षेत्रात यशस्वी करिअर घडवू शकतील, अशी माहिती आयक्यूएसी समन्वयक भगवान कडलग यांनी दिली.

एआयचे क्षेत्र दिवसागणिक अधिक प्रगत होत जाऊन अत्यंत वेगाने वाढत आहे. म्हणूनच, या क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. मशीन लर्निंग आणि एआय या विषयांत पदव्युत्तर पदवी, फाऊंडेशन, फुल स्टॅक मशीन लर्निंग अँड आर्टिफिशियल इंटेलिजन्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डीप लर्निंग या विषयात सर्टिफिकेट प्रोग्राम मिळू शकतो.

**असे मिळू शकते वेतन**

या क्षेत्रातील पदवीधारक विद्यार्थ्याला सुरुवातीलाच महिन्याला ५० ते ६० हजार ते लाखाच्या घरात वेतन मिळू शकते. त्यानंतर अनुभव आणि कौशल्य यांच्या आधारे वेतन वाढू शकते.

> विद्यापीठाने कला आणि वाणिज्य शाखेसाठी एआय संदर्भातील अभ्यासक्रम डिझाईन करावा. यासाठी केवळ प्रयत्नच करीत नसून आग्रहीदेखील आहोत.
>
> **- नितीन ठाकरे,** सरचिटणीस, मविप्र समाज संस्था

> २०२५ पर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात जगभरात सुमारे ९.७० कोटी नवीन नोकऱ्या निर्माण होणार असून, भारतात २०२८ पर्यंत केवळ एआय नव्हे तर आयओटी, क्लाऊड कॉम्प्युटिंगसह इतर अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये एकत्रितपणे सुमारे २.७३ कोटी नवे रोजगार निर्माण होणार आहेत. नव्या शिक्षणदृष्टीचा स्वीकार करूनच आपण पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न साकार करू शकतो.
>
> **- प्रा. किरणकुमार जोहरे**


**तिन्ही शाखांसाठीही उपयुक्त**

कला, विज्ञान आणि वाणिज्य या तिन्ही शाखांमधील विद्यार्थ्यांना आर्थिक स्वावलंबी बनवत आत्मनिर्भर होण्यासाठी महाविद्यालयात एआयवर लवकरच विशेष अभ्यासक्रम राबविणार आहेत. मविप्रचे सरचिटणीस अॅड. नितीन ठाकरे आणि शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हे महत्त्वपूर्ण पाऊल टाकत आहोत, असे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. (डॉ.) सुरेश जाधव यांनी सांगितले. येत्या काळात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळांतर्फे कला व वाणिज्य विद्यार्थ्यांसाठी एआयवर अभ्यासक्रम आल्यास या विद्यार्थांना एआय शिकविण्यासाठी आघाडीवर राहू, असे ते म्हणाले.

# गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला

## मालेगावी नेत्रदीपक विद्युत रोषणाई भाविकांचे आकर्षण

**मालेगाव । प्रतिनिधी**



भक्तीमय वातावरणात सुरू असलेल्या गणेशोत्सवाने शहरासह तालुक्यात उत्साहाचे उधाण आले आहे. सार्वजनिक मंडळांनी प्रतिष्ठापना केलेल्या गणरायाच्या विविध रूपांचे दर्शन घडविणाऱ्या भव्य मूर्तींचे दर्शन घेण्यासाठी सायंकाळी भाविकांच्या गर्दीने रस्ते ओसंडून वाहत आहे. अधूनमधून बरसणाऱ्या पावसांच्या सरी देखील भक्तांचा उत्साह वाढविणाऱ्या ठरत आहे. डोळ्यांचे पारणे फेडणारी विविध रूपातील भव्य श्रीमूर्ती व नेत्रदीपक विद्युत रोषणाई यंदाच्या गणेशोत्सवाचे विशेष आकर्षण ठरली आहे.

शहरातील सुमारे पाचशेहून अधिक मंडळांनी लाडक्या विघ्नहर्त्याच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. वाजतगाजत गणेशोत्सवाला अपूर्व उत्साहात सुरवात केली गेली. शहरात ३४७ नोंदणीकृत सार्वजनिक गणेश मंडळे आहेत. याशिवाय लहान व कॉलनी मंडळांची संख्याही मोठी आहे. सर्वात जास्त गणेशमंडळे छावणी हद्दीत असून त्या खालोखाल कॅम्प पोलीस ठाण्याचा क्रमांक लागतो. तालुक्यातील विविध गावात एक गाव एक गणपती स्थापन करण्यात येतो. यंदाही तालुक्याच्या ग्रामीण भागात हा उपक्रम राबवून एक गाव एक गणपतीची स्थापना करण्यात आली आहे. तालुका पोलिसांच्या हद्दीत २५ गावात तर वडनेर-खाकुर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सहा गावात एक गाव एक गणपती ही संकल्पना राबवून उत्सव साजरा करण्यात येत आहे. तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकुण ८१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे असून त्यात ४१ लहान तर १५ मोठी मंडळे आहेत. वडनेर-खाकुर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीत २९ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे असून त्यात १४ गणेशोत्सव मंडळे मोठी आहेत तर ९ लहान गणेशोत्सव मंडळांनीही आपल्या बाप्पाची प्रतिष्ठापना केली आहे.

पावसाने ओढ दिल्याने चिंतातूर झालेल्या शहरवासियांसह शेतकऱ्यांचे संकट विघ्नहर्त्याने आगमनापूर्वीच दूर केले. सर्वत्र मुसळधार पर्जन्यवृष्टी झाल्याने खरीप पिकांना जीवदान लाभले तर ओसंडून वाहत असलेल्या नद्या, नाले तसेच धरण तुडूंब भरल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील निकाली निघाला. त्यामुळे चिंतामुक्त भाविकांनी गणरायाचे स्वागत मंगलमय वातावरणात केले. गत आठ दिवसापासून शहरासह ग्रामीण भागात गणेशोत्सवाची धामधूम सुरू आहे. यानिमित्त धार्मिक व विविध समाजप्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन मंडळांतर्फे केले जात आहे. विविध रूपातील गणरायाच्या भव्य मूर्ती तसेच नेत्रदीपक विद्युत रोषणाई मंडळांतर्फे करण्यात आली असल्याने ती पाहण्यासाठी सायंकाळी भाविकांच्या गर्दीने रस्ते फुलून निघत आहे.

शहरातील भगवंत व्यायाम शाळा, सम्राट मंडळ आदी मंडळांतर्फे आरास प्रदर्शन सुरू करण्यात आले आहे. बहुतांश मंडळांतर्फे शुक्रवारी आरास प्रदर्शन केले जाणार आहे. धार्मिक, सामाजिक, राजकीय आदी विविध विषयांवर हे आरास केले जाणार असून त्याच्या तयारीत मंडळाचे कार्यकर्ते व्यस्त आहेत. आरास प्रदर्शनासह मंडळांतर्फे सत्यनारायण महापूजा देखील केली जाणार आहे.

**शुक्रवारी आठवडे बाजार बंद**

पैगंबर जयंतीनिमित्त काढण्यात येणारी मिरवणूक व गणेश आरास दर्शन पार्श्वभूमीवर येत्या शुक्रवारी भरणारा आठवडे बाजार बंद ठेवण्यात येणार आहे. परंपरेनुसार ५ सप्टेंबर रोजी शहरातील सार्वजनिक गणेश मंडळे आरास प्रदर्शन सादर करणार आहेत. तसेच मुस्लीम बांधवांतर्फे ईद-ए-मिलाद सणानिमित्त मिरवणुका काढल्या जाणार आहेत. शुक्रवारी आठवडे बाजार भरत असलेल्या परिसरात सकाळी मुस्लीम बांधवांच्या मिरवणुका आणि संध्याकाळी गणेशोत्सवातील आरास असल्याने गर्दी वाढून सार्वजनिक सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकणार असल्याने शुक्रवारी भरणारा भाजीपाला आठवडे बाजार बंद करण्यात येत आहे. याची शेतकरी, व्यापारी व नागरिकांनी नोंद घ्यावी असे आवाहन आयुक्त रविंद्र जाधव यांनी केले आहे.

# सुविधा न दिल्यास विसर्जन नाही

## सार्वजनिक संघर्ष समितीचा इशारा



**मालेगाव । प्रतिनिधी**

गणेश उत्सव काळातही मनपाकडून सुविधा दिल्या जात नसल्याच्या निषेधार्थ आज सार्वजनिक संघर्ष समितीचे प्रमुख रामदास बोरसे यांनी कार्यकर्त्यांसह सरदार चौकात गणरायास सोबत घेत ठिय्या आंदोलन केले. सुविधा न दिल्यास गणेश विसर्जन होणार नाही, असा इशारा यावेळी आंदोलकांतर्फे दिला गेला.

दीड महिन्या अगोदर निवेदन देत शहरातील मिरवणूक मार्गावरील समस्या अवगत करुन दिल्या मात्र त्यांचे अद्यापपावेतो निवारण झालेले नाही. मिरवणूक मार्गात जागोजागी गटारीवर ढापे नाही रामदास बोरसे सारख्या जेष्ठ समाजसेवक वारंवार आंदोलन करावे लागते आणि मनपा अधिकारी बघ्याची भूमिका घेत असतील तर मनपाच्या एकही अधिकारीना फिरकू देणार नाही असा इशारा देवा पाटील यांनी यावेळी दिला. अतिरिक्त आयुक्त नूतन खाडे, उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक आयुक्त स्वच्छता अनिल पारखे, जनसंपर्क अधिकारी पंकज सोनवणे , उपअभियंता शांताराम चौरे, प्रमुख निरीक्षक स्वच्छता एकबाल जान मोहम्मद आदी अधिकारींनी दोन दिवसात मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले. यावेळी भालचंद्र खैरनार, शाम भावसार, देवेन्द्र कुलकर्णी, हर्षद गुप्ता, चेतेश आसेरी, तुषार छाजेड, अक्षय महाजन उपस्थित होते.

# ९० दुचाकी-चालकांवर सिन्नरला कारवाई

**सिन्नर । वार्ताहर**



सिन्नर पोलिसांनी शहरात फिरणाऱ्या ९० बेशिस्त दुचाकीधारकांवर कारवाई करत त्यांच्याकडून ४० हजारांचा दंड वसूल केला.

पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे यांनी शहरातील बेशिस्त दुचाकीधारकांवर कारवाई करण्याच्या सूचना पोलिसांना केल्या होत्या. त्यानुसार हवालदार रविंद्र चिने व पथकाने शहरातील गावठा, बसस्थानक, आडवा फाटा व महाविद्यालय परिसरात दुचाकीवरुन ट्रीपल सिट फिरणाऱ्या, फॅन्सी नंबर प्लेट, फटाका सायलेन्सर व वाहतुकीस अडथळा आणणाऱ्या ९० वाहनचालकांवर कारवाई केली. या कारवाईत फटाका सायलेन्सर असणाऱ्या ३० दुचाकींचे सायलेन्सर खोलून जप्त करण्यात आले. पोलिसांकडून शहरात बेशिस्तपणे दुचाकी चालवणाऱ्यांवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून यापूढील काळातही ही कारवाई सुरुच राहणार असल्याचे चिने यांनी स्पष्ट केले.

### उद्या द्राक्ष अभ्यास शिबिर

**कसबे सुकेणे ।** दाभोळ द्राक्ष प्रयोग परिवाराच्या वतीने उद्या शुक्रवार (दि.५) सकाळी १०.३० वाजता पिंपळगाव बसवंत स्वयंवर बँक्वेट हॉल येथे द्राक्ष पिकासंदर्भात अभ्यास वर्ग व शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.यात द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

शिबिरात नवीन द्राक्ष जाती व त्यांना निर्यातीला असलेला वाव या विषयावर विलास शिंदे मार्गदर्शन करणार आहे. तसेच अमित पडोळ, मोहन बोबडे, प्रविण मोगल, वासुदेव काठे, वासुदेव काठे व तुषार ढिकले, रामचंद्र चुंबळे, डॉ.साकेत कुमार हे मार्गदर्शन करणार आहे. शिबिरात ४० कंपन्यांचे स्टॉल लावले जाणार आहे. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी या शिबिरात भाग घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या शिबिरात महिला द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचाही सक्रिय सहभाग राहणार आहे.

# सगर संस्थेचे बहुजनांसाठी काम : खा. वाजे

## फुले संकुलात महिला महाविद्यालयाच्या विस्तारित इमारतीचे लोकार्पण

**सिन्नर । वार्ताहर**



शहरात प्रथम महिला महाविद्यालय सुरू करणारी आणि बहुजन समाजासाठी सिन्नरमध्ये सर्वात जास्त काम करणारी संस्था म्हणून सगर विद्या प्रसारक शिक्षण संस्थेचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल, असे प्रतिपादन खासदार राजाभाऊ वाजे यांनी केले.

येथील महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक संकुलात एसएनडीटी सलग्न महिला महाविद्यालयाच्या विस्तारीत इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सत्यजित तांबे, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सिमंतीनी कोकाटे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष नामदेव लोंढे, सेक्रेटरी नामदेव लोणारे, उपाध्यक्ष जुगल गवळी, सह सेक्रेटरी रामनाथ बलक, खजिनदार मधुकर खर्जे, दत्तात्रय गोळेसर व्यासपिठावर उपस्थित होते. संस्थेचे जेष्ठ सभासद पांडुरंग मिठे व मान्यवरांच्या हस्ते विस्तारित इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. संस्थेचे सेक्रेटरी लोणारे यांनी संस्थेच्या स्थापनेमागील उद्देश व ध्येयाबाबत माहिती दिली. माजी विद्यार्थी विजय झगडे यांनी संस्थेच्या इतिहासाचा लेखाजोखा मांडला. निवृत्त क्रीडा शिक्षक नामदेव महात्मे यांनी इतर महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा आणि प्राध्यापकांच्या महिला महाविद्यालय उभारणी बाबतच्या प्रतिक्रियांचा आवर्जून उल्लेख करत तालुक्यात खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन पाहुण्यांना केले. संस्थेच्या निवडणुकीनंतरही संस्थेतील पदाधिकारी आणि समाजातील मान्यवरांनी एकत्र येऊन संस्थेच्या विकासाला लावलेला हातभार हा अभिमानास्पद असल्याचे कोकाटे म्हणाल्या. आ. तांबे यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी संचालक दत्तात्रय लोणारे, संदीप गवळी, मंगल झगडे, सुधाकर गोळेसर, दत्ता झगडे, दिगंबर पगर, दत्तात्रय लोंढे, संजय माळी, सरला वरंदळ यांच्यासह शिक्षक, समाज बांधव उपस्थित होते. सूत्रसंचलन गौरी मोरे यांनी केले. आभार संस्थेचे सहसेक्रेटरी रामनाथ बलक यांनी मानले.

**विद्यार्थ्यांसाठी १०० बेंच भेट**

तालुक्यातील लोणारवाडी येथील भैरवनाथ मित्र मंडळ टांगा ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत संकुलातील विद्यार्थ्यांसाठी १०० बेंच भेट दिले. त्यांच्या या योगदानाबद्दल संस्थेच्यावतीने खा. वाजे यांच्या हस्ते ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# जनआक्रोश मोर्चासाठी ठाकरे शिवसेना, मनसेची बैठक

**घोटी । वार्ताहर**



महायुती सरकारविरोधात निषेध व्यक्त करण्यासाठी नाशिक येथे शिवसेना ठाकरे गट व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने शुक्रवारी (दि.१२) संयुक्त जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या नियोजनासाठी उद्धव बाळासाहेब ठाकर तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांची नियोजन बैठक राजाराम साळवी मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.

आढावा बैठकीसाठी व्यासपीठावर शिवसेना उबाठाचे उपनेते दत्ता गायकवाड, मनसेचे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, माजी आमदार वसंत गिते, उबाठा जिल्हाप्रसुख डी. जे. सूर्यवंशी, माजी नगरसेवक सलीम शेख, उपजिल्हा प्रमुख भैय्या मणियार, लोकसभा सन्मवयक निवृत्ती जाधव, मनसेचे जिल्हाध्यक्ष अंकुश पवार यांनी मार्गदर्शन केले. शिवसेना उबाठा गटाचे उपनेते दत्ता गायकवाड म्हणाले की, भाजप व महायुती सरकार सर्वसामान्य जनतेची फसवणूक करत आहे. या सरकारमुळे प्रचंड प्रमाणात महागाई व भ्रष्टाचार वाढला आहे.

भाजपने इतर पक्षांचे आमदार फोडून सत्ता स्थापन केली. या भ्रष्ट सरकारचा निषेध करण्यासाठी नाशिक येथे १२ सप्टेंबर रोजी जनआक्रोश मोर्चाचे आयोजन केले असून या जनआक्रोश मोर्चाला जास्तीत जास्त पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मनसेचे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील यांनी केले.

या आढावा बैठकीला मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष संदीप किर्वे, उबाठाचे उपजिल्हाप्रमुख कुलदीप चौधरी, मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष संदीप किर्वे, तालुकाप्रमुख राजेंद्र नाठे, मनसेचे तालुकाध्य रामदास आडोळे, माजी जिल्हा परिषद सदस्य कावजी ठाकरे, विठ्ठल लंगडे, भगवान आडोळे, मूलचंद भगत, दौलत बोंडे, भागीरथ मराडे, अर्जुन भोर, रमेश धांडे, भोलानाथ चव्हाण, नंदलाल भागडे, रामदास चव्हाण, कृष्णा भगत, संपत डावखर, अनिल भोपे, प्रताप जाखेरे, हनुमंता गायकवाड, बाळू शेळके, नंदू पाडेकर, प्रभाकर मुसळे, देवराम म्हसणे आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी काँग्रेसचे विलास शिंदे यांनी शिवसेना उबाठा गटात प्रवेश केला.





# 'देशदूत' निफाड कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते आरती

**निफाड । प्रतिनिधी**

'देशदूत'च्या निफाड विभागीय कार्यालयात श्रींची आरती करण्यासाठी साठी सकाळी जिल्हा दुध संघ माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते शिवाजीराजे ढेपले, निफाड अर्बन बँक संचालक संजय पोफळिया, निफाड उपजिल्हा रुग्णालय अधीक्षक डॉ.राजीव तांभाळे, डॉ.परदेशी उपस्थित होते.

त्यांच्या हस्ते गणेश आरती करण्यात आली. तसेच सायंकाळी ७ वाजेच्या आरतीला निफाड-सिन्नर प्रांताधिकारी डॉ.शशिकांत मंगरूळे, निफाड जिल्हा न्यायालयातील अॅड.प्रविण क्षीरसागर उपस्थितीत होते.

